<u>अर्जदार तर्फे साक्षीदार क्र. –०१</u>

<u>फौ.किरकोळ अर्ज क्र.५१०/२०१८</u>
प्रियंका विरुध्द लोकेश
निशाणी – २१ च्या खाली

मी शपथपूर्वक खरे सांगतो की
निशाणी २७ च्या आदेशानुसार
<u>उलटतपास शपथेवर सुरु गैरअर्जदारा मार्फत वकील रिना गणवीर यांच्या मार्फत</u> –

१६. मी गैरअर्जदार क्र.१ लग्नापूर्वी ओळखत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार क्र.१ नात्यातील आहे. हे म्हणणे खरे आहे की मी व गैरअर्जदार क्र.१ घरच्यानच्या संमतीने लग्न ठरले होते. लग्नाच्या वेळेस मला माहिती होते की गैरअर्जदार क्र.१ घरी आई वडील आहेत. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ हा एकुलता एक मुलगा आहे. माझे शिक्षण १२वी पर्यत झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की लग्नानंतर मला एकत्र कुटुंबात राहायचे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की स्वतंत्र राहण्यासाठी गैरअर्जदार क्र.१ सोबत वारंवार भांडण करीत होते. हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदार क्र.१ ला घरजावई राहण्यासाठी जबरदस्ती करीत होते. हे म्हणणे खरे नाही की माझे सासु सास–यांन सोबत कधीही पटले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे माझ्या सासु सास–या सोबत पटत नव्हते ही बाब मी माझ्या आईवडीलांना सांगायची. हे म्हणणे खरे नाही की कोणतेही कारण नसतांना मी गैरअर्जदारां सोबत भांडण करायचे व पोलीस ठाण्यात तक्रार देण्याची धमकी दयायची. साक्षीदार स्वतःहून सांगते की मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी गरोदर असतांना मला भंडारा येथील दवाखान्यात उपचार घ्यायचे नव्हते म्हणून मी गैरअर्जदार क्र.१ सोबत भांडण करीत होते. हे म्हणणे खरे नाही की कोणतेही कारण नसतांना मी आई कडे जात असे. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ ला न सांगता मी कामठी येथे गर्भपात करुन घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की मला गैरअर्जदार क्र.१ सोबत राहायचे नव्हते म्हणून मी कामठी येथे येऊन गर्भपात करुन घेतला. हे म्हणणे खरे नाही की कोणतेही कारण नसतांना मी गैरअर्जदारचे घर सोडून आले आहे. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ ने त्यांच्या वकीला मार्फत नांदविण्याची नोटीस मला पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की या अर्जाचे कामकाज सुरु असतांना गैरअर्जदार क्र.१ ने मला नांदविण्यासाठी प्रयत्न केले परंतु मी त्याला नकार दिला.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की मी घरी खाजगी क्लॉस घेते. साक्षीदार सांगते की माझी बहीण घेते व मी तिला मदत करते. हे म्हणणे खरे नाही की खाजगी क्लॉस मधून मला दरमहा रुपये २०,०००/- ते २५,०००/- मिळतात. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ चे उत्पन्नाचे साधन नाही व तो वडीलांच्या पेशन वर जीवन जगत आहे. माझा घटस्फोट झाला अगर कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदारांना फसविण्याकरीता मी खोटी केस दाखल केली आहे व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.
**फेरतपासणी नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

**स्वाक्षरी/-**

कामठी
दिनांक २०/१२/२०२३

( अमित अ. कुळकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१, कामठी